महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/- मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २५ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०६४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मृत्यूचा महामार्ग

## गेल्या १२ वर्षांमध्ये वाडा-भिवंडी महामार्गावर ६०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू



### निधी मंजूर होऊनही काम झालं नाही

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः भिवंडी-वाडा-मनोर रस्त्याची पाहणी केली होती. त्यानंतर या रस्त्यासाठी 801 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. सध्या हा 64 किलोमीटरचा रस्ता मृत्यूचा सापळा ठरत आहे. ठिकठिकाणी खोल आणि मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. या कामासाठी ईगल इन्फ्रा कंपनीला 801 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. अतिरिक्त 80 कोटी रुपये कॉँक्रीट पॅच मारण्यासाठी मंजूर करण्यात आले आहेत. एकूण 881 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्यानंतरही या रस्त्याच्या कामाचा दर्जा आणि गती अत्यंत असमाधानकारक आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवाला दररोज धोका निर्माण होत आहे. प्रवास करताना अपघाताचा मोठा धोका कायम आहे.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-वाडा मार्गांवर दरवर्षीप्रमाणे यंदाही लाखो जीवघेणे खड्डे तयार झाले आहेत. या खड्डयांमुळे अपघातांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. गेल्या 12 वर्षांमध्ये 600 हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, केवळ गेल्या 3 वर्षांतच 75 नागरिकांनी या मार्गावर अपघातात जीव गमावला आहे. या गंभीर परिस्थितीसाठी जबाबदार असलेल्या ठेकेदारांवर कुठलीही कारवाई न होता, त्यांच्याविरोधात शासकीय यंत्रणा हतबल असल्याचा आरोप श्रमजीवी संघटनेचे प्रवक्ते प्रमोद पवार यांनी केला आहे.

कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप : विशेष म्हणजे, गेल्या 12 वर्षांपासून भिवंडी-वाडा रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आंदोलनं करण्यात येत आहे. असे असताना संबंधित विभागानं ठेकेदारांचे उखळ पांढरे करत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप श्रमजीवी संघटनेचे प्रवक्ते प्रमोद पवार यांनी केला आहे.



## लालबागच्या राजाची पहिली झलक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** मुंबईत गणेशोत्सवाची सुरुवात होते ती लालबागच्या राजाच्या आगमनाने. यंदाही गणेशोत्सवापूर्वी लालबागच्या राजाचं पारंपरिक फोटो सेशन थाटात पार पडलं, ज्यामुळे भक्तांना त्यांच्या लाडक्या राजाचं पहिलं दर्शन झालं. यावर्षी लालबागच्या राजाचा दरबार एका वेगळ्याच वैभवाने नटलेला आहे. यंदाचा गणपती बाप्पा तिरुपती बालाजीच्या सुवर्ण राजमुकुटात विराजमान झाला आहे. त्यासाठी खास 'सुवर्ण गजानन महाल' साकारण्यात आला आहे. राजाची वात्सल्यमूर्ती सोन्याच्या अलंकारांनी सजवली आहे. सुवर्ण पाऊलांपासून ते सुवर्ण राजमुकुटापर्यंत राजाचा हा राजेशाही थाट खरंच डोळ्यांचे पारणे फेडणारा आहे.

थोडक्यात महत्वाचे



## भिवंडी तालुक्यातील वाहतूक कोंडीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी )**

भिवंडी ठाणे महामार्गावरील अंजूरफाटा,पुर्णा, कोपर,काल्हेर कशेळी या रस्त्यावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने स्थानिक ग्रामस्थांसह प्रवासी शालेय विद्यार्थी, नोकरदार वर्ग आणि व्यापाऱ्यांना तसेच वाहन चालकांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.वाहतूक नियोजन संदर्भात शासन व वाहतूक पोलीसाना माहिती देऊन सुध्दा दुर्लक्ष होत असल्याने त्रस्त व संतप्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडी विरोधात अंजूरफाटा येथे रस्तारोको आंदोलन करीत वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी केली.स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरल्याने या मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. या आंदोलनात स्थानिक नागरिक,रिक्षाचालक ,टेम्पो चालक व व्यापारीवर्गासह महाराष्ट्र नवनिर्माण सेना, काँग्रेस व शिवसेनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी नागरिकांनी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत आपला संताप व्यक्त केला.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठाणे घोडबंदर रस्त्यावरील अवजड वाहतूक थांबविण्याचे आदेश दिल्याने या मार्गावरील अवजड वाहने थेट भिवंडी मार्गाने येत असल्याने काही दिवसां पासून या महामार्गावरील रस्त्यावर

मोठ्या वाहतूक कोंडी होत आहे.18 कि.मी अंतरावर असलेल्या ठाणे कडे तसेच काल्हेर कशेळी कडे जाण्यासाठी दोन ते तीन तास लागत असल्याने वाहन चालक व नागरिकांना प्रचंड वाहन कोंडीचा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.या मार्गाचे दोन्ही बाजूला ट्रान्सपोर्ट मालाची साठवणूक करणारी गोडाऊन आहे या गोडाऊन मध्ये जाताना अनेक वाहनचालक नियमांचे उल्लंघन करीत असल्याने वाहतूक कोंडी मध्ये अधिक भर पडत आहे वाहतूक पोलीस व वार्डन हे वाहतूक सुरळीत करण्यासाठी रस्त्यावर उभे आहेत मात्र नियोजन होत नसल्याने वाहन वाहतूक कोंडी मध्ये अडकून पडत आहे शहरातून होणारी जड वाहनांची वाहतूक त्वरित थांबवावी आणि खराब रस्ते दुरुस्त करून खड्डे त्वरित भरावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

> भिवंडी ठाणे हा मुख्य मार्ग असल्यामुळे या मार्गावरील खराब रस्ता दुरुस्ती करून घेणे गरजेचे आहे. तसेच घोडबंदर मार्गावरील भिवंडीत येणारी येणाऱ्या जाणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक तात्काळ थांबवून वाहतुकी संदर्भात पोलिसांनी नियोजन करणे गरजेचे आहे.या मार्गावर शाळा तसेच विविध ट्रान्सपोर्ट मालाची साठवणूक करणारी गोडाऊन आहेत वाहतूक कोंडीमुळे त्याचा सर्वांना त्रास होत असतो विशेष करून प्रवासी नागरिक, स्थानिक ग्रामस्थ व शालेय विद्यार्थ्यांना या वाहतूक कोंडीचा फार मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन याबाबत उपाययोजना करावी.
>
> ● नारायण चौधरी
> माजी नगरसेवक
> भिवंडी.

## उपवन तलावात बुडून दहा वर्षीय मुलाचा मृत्यू



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - शहरातील उपवन तलावात एक १० वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणाची नोंद वर्तकनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

राज भास्कर चाबूकस्वार (१०) असे तलावात बुडून मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. तो वर्तक नगर भागातील भीमनगर परिसरात राहत होता. राज हा त्याच्या दोन मित्रांसोबत उपवन तलावाच्या काठावर फिरण्यासाठी गेला होता. तेव्हा राज पोहण्यासाठी तलावात उतरला. पोहताना त्याला पाण्याचा अंदाज आला नसल्यामुळे तो पाण्यात बुडाला. या घटनेची माहिती मिळताच, वर्तकनगर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान, अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान आणि अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने राजला बाहेर काढण्यात आले. त्यानंतर, वर्तकनगर पोलीस अधिकारी यांच्यामार्फत पुढील कार्यवाहीकरिता रुग्णवाहिकेमधून ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात त्याला दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# मुरबाडसाठी पाच नव्या एस.टी. बस

## आमदार किसन कथोरेंच्या हस्ते लोकार्पण!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड-प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यातील नागरिकांचा एस.टी.चा प्रवास सुखकर व्हावा यासाठी आमदार कथोरे नेहमीच प्रयत्नशिल असतात. त्या दृष्टीने मुरबाड करांसाठी काही दिवसापूर्वी 10 नविन बस मंजूर केल्या होत्या त्यापैकी 5 बसेस यापुर्वीच दाखल झाल्या होत्या व उर्वरित पाच बस शिल्लक होत्या त्याचे लोकार्पण आज मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरेंच्या हस्ते मुरबाड आगारात करण्यात आले.

ऐन गोरी गणपती सणापुर्वी मुरबाड बस आगाराच्या ताफ्यात या नविन बसेस उपलब्ध झाल्या असल्याने मुरबाड करांचा प्रवास काही अंशी सुखकर होणार आहे.सध्या



मुरबाड बस स्थानकाचे नुतनीकरणाचे काम सुरु आहे ते लवकर पुर्ण व्हावे अशी मुरबाड तालुक्यातील नागरिकांचे म्हणने असुन नविन बसेस या मुरबाड-कल्याण, मुरबाड-बदलापुर , मुरबाड-शहापुर या मार्गावरच चालवाव्या अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

दरम्यान आमदार किसन कथोरे यांनी पत्रकारांशी वार्तालाप करताना सांगितले की गौरी -गणपती सणापुर्वी 5 बसेस दाखल झाल्या असल्याने मुरबाड करांसाठी आनंदाची बाब असून सध्या बस स्थानकाचे काम जरी संथ असेल परंतु ते क्वालिटीचे काम होणार असून सर्व सोयीनी युक्त व हायटेक असे बस स्थानक निर्माण होणार आहे. कल्याण -मुरबाड रस्त्याचे काम व बस स्थानका समोरील उड्डाणपूलाचे काम लवकरच पूर्ण होईल ते झाल्यावर मुरबाड शहराला एक एक वेगळे रुप पाहायला मिळणार असल्याचे यावेळी सांगितले.

या लोकार्पण सोहळ्यासाठी उल्हास बांगर, शिवसेनेचे कांतीलाल कंटे, राष्ट्रवादीचे चंद्रकांत बोस्टे, रिपाईचे दिनेश उघडे, बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर , सुहास मोरे,मोहन सासे, किसन कथोरे,मुकेश विशे, ज्योती गोडांबे, जितेंद्र भावार्थे,जयवंत कराळे, आण्णा साळवे, सुरेखा खोलंबे,नरेश मोरे , दिलीप देशमुख, आगार प्रमुख योगेश मुसळे यांच्यासह बस आगाराचे कर्मचारी उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले कलामंदिर कात टाकणार

## १५ कोटींचा निधी पालिकेकडे वर्ग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : साहित्यिक आणि कलावंतांची नगरी डोंबिवलीची आन, बाण आणि शान असलेले सावित्रीबाई फुले कलामंदिर टाकणार कात आहे. डोंबिवलीसह आसपासच्या शहरांसाठी नाट्य चळवळीचा केंद्रबिंदू असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेच्या या नाट्यगृहाचा लवकरच चेहरामोहरा बदलणार आहे.

काही दिवसांपूर्वी कलामंदिरातील अंतर्गत भागात झालेल्या पडझडीनंतर त्याच्या विकासासाठी निधीची मागणी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती.

त्यानंतर नगरविकास विभागाने या नाट्यगृहासाठी 35 कोटींचा भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यातील 15 कोटी रूपयांचा निधी कल्याण - डोंबिवली महानगर पालिकेकडे वर्ग देखील करण्यात आला आहे. नुकत्याच या निधीचा निर्णय शासनाने जाहीर केला. त्यामुळे नव्या रूपातले नाट्यगृह लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले. डोंबिवली आणि आसपासच्या परिसरातील नाट्यरसिकांसाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले कलामंदिर हे हक्काचे ठिकाण आहे.






## वाचक मनोगत

# गणेशोत्सवात विधायक कामे व्हावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजाविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तीची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सागितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सागितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित करावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य , निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

**श्याम ठाणेदार, दौंड**



# तरुणांनो तयारीला लागा

## पोलीस सेवेत काम करण्याची संधी वाट पाहतेय

## १५६३१ जागांवर पोलीस भरतीचा निर्णय

**महाराष्ट्रातील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या हजारो तरुणांना राज्य शासनाकडून अखेर दिलासा मिळाला आहे. गृह विभागानं 15631 जागांवर पोलीस शिपाई भरती करण्याचा निर्णय घेतण्यात आला आहे. महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई आणि कारागृह विभागातील कारागृह शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी राबविण्यात येणा-या भरती प्रक्रियेस मान्यता देणारा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. 12 ऑगस्ट 2025 झालेल्या राज्य मंत्रिडळाच्या बैठकीत पोलीस दलातील सुमारे 15 हजार पदांच्या भरतीस मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.**

महाराष्ट्र पोलीस दलातील शिपायांची सुमारे 15 हजार पदे भरण्यात येणार आहेत. त्यासाठी आज (12 ऑगस्ट) 2024-2025 च्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात आलीय, असं महाराष्ट्र सरकारनं सांगितलंय. या भरतीमध्ये सन 2022 व सन 2023 मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार आहे व भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

तसंच, राज्याच्या पोलीस दलात सन 2024 दरम्यान रिक्त असलेली व 2025 मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन, ही भरती करण्यात येणार आहे. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया त्या-त्या जिल्हा स्तरावरून राबविण्यात येते. त्यासाठी ओएमआर (OMR) आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल. भरती अर्ज मागवणे, अर्जाची छाननी करणे, त्यावर प्रक्रिया तसेच उमेदवारांची शारीरिक परीक्षा, त्यातून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा यासाठी अनुषांगिक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार 'प्रशिक्षण व खास पथके विभाग'चे अतिरिक्त पोलीस महासंचालक यांना देण्यासही राज्य सरकारनं मान्यत दिलीय.

2019 पर्यंत भरतीचा क्रम पुढीलप्रमाणे असा होता- अर्ज भरणे, मैदानी परीक्षा आणि लेखी परीक्षा. मात्र 2019 मध्ये पहिल्यांदाच लेखी परीक्षा आधी आणि नंतर मैदानी परीक्षा घेतली गेली होती. 2019 पर्यंत एका उमेदवाराला पात्रतेनुसार एकापेक्षा जास्त फॉर्म भरता येत असत. उदा. पात्र उमेदवार एकाचवेळी चालक आणि बॅण्डसमन पदासाठी अर्ज करू शकत होता. मात्र 2019 मधील भरती प्रक्रियेत एका उमेदवाराला केवळ एकच अर्ज भरता आला. उमेदवारांच्या विरोधानंतर ही अट काढून टाकण्यात आली होती. अलीकडच्या काळात पोलीस भरतीच्या प्राथमिक अर्जाची जबाबदारी खासगी कंपन्यांना देण्यात आली आहे. यापूर्वी 'टीसीएस' आणि 'आयबीपीएस' या कंपन्यांवर ही जबादारी सोपविण्यात आली होती.

पोलीस दलातील भरती काही हजार जागांसाठी होत असली तरी भरतीसाठी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांची संख्या काही लाखांमध्ये असते. एक उमेदवार एकापेक्षा जास्त अर्ज भरू शकतात. वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर नमूद केलेल्या कालावधीमध्ये ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरणे बंधनकारक असते.

**भरण्यात येणाऱ्या पदांची संख्या अशी असेल :**

पोलीस शिपाई - 12,399
पोलीस शिपाई चालक - 234
बॅण्ड्स मॅन - 25
सशस्त्र पोलीस शिपाई - 2,393
कारागृह शिपाई - 580
एकूण - 15,631

### पोलीस भरतीसाठी तयारी कशी करायची?

पोलीस शिपाई पदासाठी शारीरिक चाचणीसोबतच लेखी परीक्षेचा अभ्यास देखील करावा लागतो. दोन्हीसाठी मिळून तयारीसाठी सहा महिन्यांचा कालावधी पुरेसा असतो. शारीरिक आणि लेखी परीक्षा मिळून 150 गुणांची असते. यामध्ये 50 गुणांसाठी शारीरिक चाचणी आणि 100 गुणांची लेखी परीक्षा असते. **मुलांसाठी** - गोळाफेक (15 गुण) : गोळ्याचे वजन 7 किलो 50 ग्रॅम असते. 8.5 मीटर अंतराच्या पुढे गोळा फेकावा लागतो. 100 मीटर धावणे (15 गुण) : कट ऑफ वेळ 11:50 सेकंद 1600 मीटर धावणे (20 गुण) : कट ऑफ वेळ 5 मिनिटे 10 सेकंद **मुलींसाठी** - गोळाफेक (15 गुण) : गोळ्याचे वजन 4 किलो असते. 6 मीटर अंतराच्या पुढे गोळा फेकावा लागतो. 100 मीटर धावणे (15 गुण) : कट ऑफ वेळ 14:00 सेकंद 800 मीटर धावणे (20 गुण) : कट ऑफ वेळ 2 मिनिटे 50 सेकंद

# वाशिंद पोलिस ठाण्यातंर्गत सायकलथॉन संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**आसनगाव :** भारत सरकारच्या क्रीडा विभागाच्या निर्देशानुसार व फिट इंडिया मोहिमे अंतर्गत 24 ऑगस्ट 2025 रोजी सायकलथॅान उपक्रम सपंन्न झाला. या उपक्रमात फिटनेस की डोस _ आधा घंटा रोज या संदेशाचा प्रसार करण्यात आला.

सदर उपक्रमाचा हेतू पोलीस दल व नागरिकांमध्ये चांगले आरोग्य राखण्यासाठी व्यायामासाठी वेळ काढावा व व्यायामाचा दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविणे हा आहे.

सदर उपक्रमांतर्गत रविवार दि. 24 आगष्ट रोजी सकाळी 9:00 वाजता वाशिंद पोलीस ठाणे हद्दीतील वाडा पिवळी रोड मार्गातील दहागाव



फाटा ते स्वामी समर्थ मठ दहागाव आणि तेथून पोलिस ठाणे असे एकूण पाच किलोमीटर सायकलथॉनचे आयोजन केले होते.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन राम धिंग्रा, संदीप पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले. सायकलथॉच्या या उपक्रमामधे वाशिंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर व इतर पोलीस अधिकारी आणि अंमलदार तसेच आशिष तुकाराम भोईर ( मुंबई हायकोर्ट स्टाफ ), रामदास राव (पोलीस पाटील साळमाळ) व इतर 30 ते 35 नागरिकांनी सदर उपक्रमात सहभाग घेतला होता.

सदर उपक्रमातून पोलीस दल व नागरिकांमध्ये फिटनेस की डोस - आधा घंटा रोज या संदेशाचा प्रसार करण्यात आला.

# तिसरी महामुंबईमुळे ग्रामीण तरूणांना रोजगाराचे नवे क्षितिज उपलब्ध होणार - सी. आर. म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण(प्रतिनिधी)

रायगड जिल्ह्यातील पेण ,उरण या विभागात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याची चर्चा सुरू आहे आणि ते होणारच म्हणा.या महानगरात केवळ नगररचना व उद्योग उभारणी होणार नाहीतर ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध होणार आहेत.ही नामी संधी आहे अशी माहिती सी आर म्हात्रे यांनी दिली. रस्ते, पूल ,मेट्रो, रेल्वे, गृहनिर्माण, क्षेत्रात लाखो तरुणांची गरज लागणार आहे,मिस्त्री, सुतार, इलेक्ट्रिक, काम काम करणारे, वेल्डर इंटेरियर डिझाइनर, अभियंता,रंगारी अशा विविध क्षेत्रात तरुणांना काम मिळू शकेल, जर योग्य प्रशिक्षण घेतल्यास स्थिर नोकरीची हमी आहे. माझा व्यवसाय माझा अभिमान. नवीन शहर म्हणजे हॉस्पिटल, शाळा, महाविद्यालये, मॉल्स, हॉटेल पर्यटन केंद्र, शिवाय भाजीपाला, मासे व्यवसाय , फर्निचर, वाहन दुरुस्ती, किराणा व्यवसाय, सोलर सिस्टम या मध्ये प्रचंड संधी आहे. तिसऱ्या मुंबईतील पोलिस, अग्निशामक, नगररचना, पर्यावरण यंत्रणेत नोकऱ्या, मिळतील यात स्थानिक तरुणांना जास्त संधी असेल.

मात्र आपल्या लोकप्रतिनिधींनी कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरुकरण्यासाठी शासनदरबारी आवाज उठवण्याची गरज आहे.आय टी पार्क,बँकिंग,लॉजेस्टिक उद्योग व कार्यालये उभी राहणार असल्याने संगणक ,मॅनेजमेंट मध्ये प्रशिक्षण मिळाले तर एक नवे दालन मिळणार आहे.ग्रामीण युवकांनी डिजिटल कौशल्य आत्मसात केले तरथेट कार्पोरेट क्षेत्रात स्थान मिळू शकते..दवाखाने आले की डॉक्टर, नर्स, वॉर्डबॉय,मॅनेजमेंट यामध्ये सुद्धा संधी आहे. शाळा,महाविद्यालये यामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मागणी असणार,त्यामुळे प्रशिक्षित कर्मचारी यांना जास्त मागणी असणार.शहराच्या वाढीबरोबर जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला, मटण मच्छी, अंडी या दुकानांमध्ये रोजगार मिळेल, योग्य नियोजन केले तर विविध क्षेत्र नव्याने विकसित झाले की एक सुवर्ण संधी मिळेल.रोजगारासाठी सरकारी अनुदान, त्यासाठी असणाऱ्या सरकारी योजना यांचा वापर करून तरुणाई स्वावलंबी बनेल. मात्र प्रत्येक क्षेत्रात स्थानिक तरुणांना ८० टक्के संधी मिळाली पाहिजे.तरुणांना योग्य मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले पाहिजे.

नाहीतर बऱ्याच ठिकाणी परप्रांतीय कब्जा करत आहेत तसे होता कामा नये.म्हणून जर तिसरी महामुंबई होत असेल तर येथील स्थानिक सधन झाला पाहिजे अशी माहिती वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी दिली.

# कामाशी प्रामाणिक राहून मैत्रीचे संबंध जपणारे व्यक्तिमत्व जीवन पाटील

## - निवृत्त सहाय्यक निवडणूक अधिकारी रमाकांत निकम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)**

सेवा परमो धर्म या उक्तीप्रमाणे जीवन शंकर पाटील ही एक व्यक्ती सहकारी नसून सर्व सहकाऱ्यांचा मित्र अशी ओळख निर्माण करून ना कोणाशी वाद ना कोणाशी विसंवाद, आपल्या कामाशी प्रामाणिक राहुन कर्म हीच सेवा समजणारे व्यक्तिमत्व.बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या सेवेतून सन्मानाने निवृत्त होऊन त्यांनी आपल्या सेवाकाळात सहकाऱ्यांच्या बरोबर तसेच त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांसोबत असलेले प्रेमाचे जिव्हाळ्याचे आणि आपुलकीचे संबंध आणि वागणूक या जोरावरच त्यांनी नेमून दिलेले कामकाज यशस्वीपणे पार पाडले आहे असे व्यक्तिमत्व जीवन शंकर पाटील यांच्या यशाची गाथा सांगताना अभिमान वाटतो अशी माहिती रमाकांत निकम सेवानिवृत्त सहाय्यक निवडणूक व नगर शुल्क अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिली. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात असणारे सेवाभावी व्यक्तीमत्व जीवन पाटील केलेल्या कामकाजातील ठळक आणि उल्लेखनीय अशी कामे पाहिली तर 6 डिसेंबर 2005 रोजी शिवाजी पार्क येथे







महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी पिण्याचे पाण्याची कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून महानगरपालिकेला दरवर्षी लाखो रुपयांचा फायदा करून दिला. या कामगिरीसाठी तत्कालीन मनपा आयुक्तांनी त्यांना विशेष वेतन वाढ देऊन त्यांचा गौरव केला होता. कोल्हापूर शहरात ऑगस्ट 2019 मध्ये उद्भवलेल्या भीषण परिस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केलेल्या अतुलनीय कामासाठी महापौर आणि आयुक्त यांनी विशेष प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव केला होता .तसेच या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापौर , मनपा आयुक्त ,अतिरिक्त आयुक्त उपायुक्त जल अभियंता यांनी सुद्धा त्यांचा गौरव केला होता. तसेच 9 ऑगस्ट 2025 रोजी सिंचन भवन पुणे येथे शोध अभियांत्रिकी मनाचा समारंभात सेवाभावी अभियंता " म्हणून मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. 6 ऑगस्ट 2019 रोजी अतिदृष्टीमध्ये मलबार हिल टेकडी येथे भूस्खलन होऊन पाणीपुरवठा खंडित होण्याच्या आपत्कालीन परिस्थितीत सदर ठिकाणी नवीन जलवाहिनी अत्यंत कमी कालावधी टाकून पाणीपुरवठ्याची व्यवस्था अबाधित राखण्याचे तसेच पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचे कार्य जबाबदारीने पार पाडले. या उत्कृष्ट कामगिरीसाठी तत्कालीन मनपा आयुक्तांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला होता . एवढेच काय तर कोरोना कालावधीत संपूर्ण जग ठप्प होऊन घरात बसले होते त्यावेळी सुद्धा कोणत्याही परिणामाची तमा न बाळगता रात्रंदिवस काम करून मुंबईचा पाणीपुरवठा दुरुस्ती विभागाच्या माध्यमातून सुरळीत राहील यासाठी रात्रीचा दिवस करून आटोकाट प्रयत्न केले. यासाठी त्यांच्या कार्याला अनेक राजकीय सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी आणि संस्थानी त्यांची दखल घेऊन गौरव केला होता . तसेच त्यांच्या या कार्याची दखल विविध वर्तमानपत्रांनी सुद्धा घेतली होती . त्यांनी कोरोना काळात केलेल्या कामकाजाची पुस्तिका सुद्धा प्रसिद्ध झाली आहे. ते म्युनिसिपल co-operative बँकेच्या सन 2015 ते 20 संचालक पदाच्या निवडणुकीत 65 वर्षातील विक्रमी मताने संचालक म्हणून निवडून आले होते आणि तेथे त्यांनी यशस्वी संचालक म्हणून आपल्या कामकाजाचा ठसा उमटवला होता. ते म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन या संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते आणि अद्यापही ते या संस्थेमध्ये कार्यरत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक 2017 काळात त्यांनी समन्वय अधिकारी म्हणून नेमून दिलेले काम तन-मन धनाने यशस्वीपणे पार पाडून निवडणूक कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यात मोलाचा वाटा उचलला होता .अशा या हूनहुन्नरी अभियंत्याला स्थानिक स्वराज्य संस्थेत तज्ञ प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाली तर ते या संधीचे सोने करतीलच पण त्याचबरोबर त्या संस्थेचे नाव स्थानिक पातळीवर, राज्य पातळीवर, देशपातळीवर नेऊन ठेवण्यास निश्चितच उपयोगी पडतील असा विश्वास आहे. अशा गुणी व्यक्तीला संधी मिळावी म्हणून स्वतःहून कोणाकडे किंवा कोणत्याही राजकीय पक्षाकडे मागणी करणार नाही तर परंतु या संबंधित कोणी त्यांच्या कामाची दाखल घेतली आणि त्यांना योग्य ती संधी मिळाली तर या संधीचं सोनं करतील यातील मात्र शंका नाही. त्यांच्या पुढील कार्यास खूप खूप शुभेच्छा रमाकांत निकम यांनी दिल्या आहेत.

# खून करून चोरी करणाऱ्या तरुणास चोवीस तासात अटक!

## स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांची धडक कामगिरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :: नरेंद्र पाटील**

एका वयोवृद्ध महिलेस ठार तर दुसऱ्या महिलेस गंभीर जखमी करून चोरी करून पसार झालेल्या आरोपी तरुणास वासिंदच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपास करीत चोवीस तासांच्या आत अटक केली आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहापूर तालुक्यातील किन्हवली पोलीस ठाणे अंर्तगत असलेल्या मौजे गांडुळवाड येथील नरेश दलवाणी यांच्या फार्म हाऊस मधील घरात दि. 18 ते 19 ऑगस्ट दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने प्रवेश करुन येथील दलवाणी यांची बहीण विना दौलतराम हरपलानी (वय 75 वर्षे ) हिला जिवे ठार मारुन तिच्या गळयामधील सोन्याची चैन व हातातील सोन्याची बांगड्या तर दलवाणी यांच्या आई लक्ष्मी नारायणदास दलवाणी (वय 97 वर्षे) हिस हत्याराने जिवे ठार मारण्याचे उद्देशाने डोक्यात मारहाण करुन गंभीर दुखापत करुन जबरी चोरी करण्यात आल्याची घटना घडली होती.



याबाबत नरेश नारायणदास दलवाणी रा. निर्सग उपवन, पातलीपाडा, घोडबंदर ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन किन्हवली पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहुन ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डी.एस.स्वामी, अपर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल, शहापूर उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे यांनी घटनास्थळी भेट देवून सदरचा गुन्हा उघडकीस आणणेकामी सुचना व मार्गदर्शन केले. तर गुन्हयांचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणणे कामी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळी पथके तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले.

सदर गुन्हयांचा तपास करीत असतांना वासिंद स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळावरील काम करणारे कामगार व स्थानिक नागरीक यांचेकडे विचारपुस व तांत्रीक विश्लेषणावरुन इसम नामे शिवाजी बळवंत धसाडे (वय २५ ) रा. ढाकणे, ता.शहापुर जि.ठाणे यास ताब्यात घेवुन गुन्ह्याचे अनुषंगाने कौशल्य पुर्ण विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास पुढील तपास कामी किन्हवली पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

या तपासकामी वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्या अधिपत्यामधील पो.उप.नि.महेश कदम, पो.उप.नि रोहन शेलार, पो.उप.नि. दिपेश किणी, पो.उप.नि. भाऊसाहेब गायकवाड, सहा.फौ. धनाजी कडव, प्रकाश साईल, पो.हवा.संतोष सुर्वे, सतीष कोळी, गोविंद कोळी, हेमंत विभुते, भगवान सोनावणे, जितेंन्द्र वारके, पो.शि. स्वप्नील बोडके सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण तसेच सायबर विभागाचे पो.हवा. दिपक गायकवाड, रविंद्र मोरे या पथकाने कुढलाही धागादोरा नसतांना चोवीस तासाचे आत आरोपीस अटक करुन गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपविभागीय अधिकारी मिलींद शिंदे हे करीत आहेत.



**सोमवार**
**२५ ऑगस्ट २०२५**

| मेष | वृषभ | मिथुन | कर्क |
|---|---|---|---|
| प्रॉपर्टीशी संबंधित लोकांना फायदा होईल. आज अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. | आज तुम्हाला ऑफिसमध्ये एक नवीन प्रोजेक्ट मिळेल, जो तुम्ही पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. | तुम्ही गंभीर बाबी शांततेने आणि संवादाने सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. थोडे भावूकही होऊ शकता. | घाईघाईने कोणताही निर्णय न घेणे चांगले. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. प्रसन्नता जाणवेल. |
| **सिंह** | **कन्या** | **तूळ** | **वृश्चिक** |
| मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. | कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी लक्षणीय दैदिप्यमान यश मिळेल. | दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. या राशीच्या अभियंत्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. | योग्य दिशेने कठोर परिश्रम केल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये यश मिळेल. थकवा जाणवेल. |
| **धनु** | **मकर** | **कुम्भ** | **मीन** |
| व्यवसायानिमित्त प्रवास करावा लागेल. आज तुमचा दिवस संमिश्र जाणार आहे. संकोच करु नका. | पालकांचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल. तुमच्या मुलाच्या यशाने तुम्ही आनंदी व्हाल. | आज व्यवसायात अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होणार आहे . दिवस खूपच आनंदाचा जाणार आहे. | कार्यालयात अधिकारी तुमच्या कामावर खुश राहतील. तुमच्या आवडीच्या लोकांच्या भेटी होतील. |

### २५ ऑगस्ट दिनविशेष

१९४१ : संगीतकार अशोक पत्की यांचा जन्म.
१९५२ : श्रीलंकेचा क्रिकेटपटू दुलीप मेंडिस यांचा जन्म.
१९६५ : भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक संजीव शर्मा यांचा जन्म.
२००१ : संतसाहित्याचे अभ्यासक समीक्षक डॉ. व. दि. कुलकर्णी यांचे निधन.
१२७० : फ्रान्सचा राजा लुई (नववा) यांचे निधन.

# कोकण मराठी साहित्य परिषदेची ठाणे जिल्ह्यातील नवी कार्यकारिणी जाहीर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या ठाणे जिल्ह्यातील सर्व शाखांच्या आणि ठाणे जिल्हा मंडळ अध्यक्ष पदाची निवडणूक नुकतीच पार पडली . या निवडणुकीत कोकण मराठी साहित्य परिषद ठाणे जिल्हा अध्यक्ष म्हणून कवी लेखक बाळ कांदळकर यांची पुन्हा एकदा बिनविरोध निवड झाली असून जिल्हा प्रतिनिधी म्हणून डॉ योगेश जोशी यांची निवड झाली. ठाणे जिल्हा मंडळ निवडणूकीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून श्रीमती विद्या प्रभु या उपस्थित होत्या . ठाणे जिल्ह्यात मुरबाड , अंबरनाथ , उल्हासनगर , कल्याण ग्रामीण , कल्याण शहर , कळवा शाखा आणि ठाणे शहर शाखा सध्या कार्यरत आहेत . अनुक्रमें कोमसाप ठाणे शहर शाखा अध्यक्षपदी कवयित्री संध्या लगड यांची निवड झाली , कळवा शाखा अध्यक्षपदी श्री निशिकांत महांकाळ , कल्याण शहर अध्यक्षपदी डॉ योगेश जोशी , कल्याण ग्रामीण अध्यक्षपदी श्री रविंद्र घोडविंदे , उल्हासनगर शाखा अध्यक्षपदी डॉ अनिल पावशे , अंबरनाथ शाखा अध्यक्षपदी कवी किरण येले , मुरबाड शाखा अध्यक्षपदी सौ दिपश्री इसामें यांची निवड झाली आहे . या निवडीचा कार्यकाळ २०२५ ते २०२८ पर्यंत तीन वर्षांकरिता असणार आहे . कवी बाळ कांदळकर यांना सर्व शाखाध्यक्ष आणि शाखा जिल्हा प्रतिनिधींनी पुढील तीन वर्षांकरिता ठाणे जिल्हा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नवनवीन कल्पना राबवित ठाणे जिल्ह्यात कोकण मराठी साहित्य परिषदेचे काम आणखी जोमाने सुरू होईल असे सांगितले गेले . बाळ कांदळकर आणि सर्व शाखा अध्यक्ष प्रतिनिधी यांचे स्वागत कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा डॉ प्रदिप ढवळ यांनी केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या .

कोकण मराठी साहित्य परिषद ठाणे जिल्हा कार्यकारिणी.
२०२५/२०२८
————————

-:अध्यक्ष :-
बाळ कांदळकर

-:उपाध्यक्ष :-
ॲड. सुदर्शन साळवी

-:कार्यवाह:-
महारु निकम गुरुजी

-:कोषाध्यक्ष:-
संध्या लगड

-:जिल्हा प्रतिनिधी :-
डॉ योगेश जोशी

-: कार्यकारिणी सदस्य :-
श्री रविंद्र घोडविंदे
श्री निशिकांत महांकाळ
श्री डॉ अनिल पावशे
श्री हेमंत नेहते
सौ दिपाश्री इसामे

-: सल्लागार :-
सौ नितल वढावकर
प्रा डॉ प्रकाश माळी

-: प्रसिद्धी प्रमुख :-
श्री अजित महाडकर

# दिवा - मुंब्रा भागातील बेकायदा बांधकामे ठाणे मनपाच्या रडारवर

## अनधिकृत बांधकामविरोधी विशेष पथकाची निर्मिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे (२४) : अनधिकृत बांधकामांना चाप लावण्यासाठी, दिवा आणि मुंब्रा या भागावर देखरेख करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी यांचे विशेष पथक निर्माण करण्याचे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. दिवा आणि मुंब्रा भागात अनधिकृत बांधकामांच्या अधिक तक्रारी आहेत. त्याची शहानिशा करण्यासाठी तसेच देखरेख करण्यासाठी या विशेष पथकाची निर्मिती केली जाणार असल्याचे, आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

अनधिकृत परंतु राहत्या घरांवर गणेशोत्सव काळात कारवाई केली जाणार नाही. मात्र, अधिकृतपणे बांधकाम सुरू असलेली, कोणीही राहत नसलेली, त्याचबरोबर, व्यावसायिक स्वरूपाची या अनधिकृत बांधकामांवरील कारवाई सुरूच राहणार आहे. महापालिका क्षेत्रातील या कारवाईचा आढावा महापालिका आयुक्त राव यांनी शनिवारी झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीत घेतला.



या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, परिवहनचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी, नगररचना सहाय्यक संचालक संग्राम कानडे यांच्यासह विभागप्रमुख, सर्व उपनगर अभियंता, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता उपस्थित होते. उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे यांनी बैठकीत कर्मयोगी पोर्टल, १५० दिवसांचा कार्यक्रम आदी विषयांबाबत सादरीकरण केले. उपायुक्त शंकर पाटोळे यांनी अनधिकृत बांधकामांवरील कारवाईची माहिती दिली. तर, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी गणेश मूर्ती कार्यशाळा आणि विसर्जन व्यवस्था याची माहिती दिली.

मा. उच्च न्यायालयाने अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सर्व प्रभाग समिती क्षेत्रात कारवाई सुरू आहे. आतापर्यंत २२७ बांधकामांवर कारवाई झाली असून २४ गुन्हे दाखल झाले आहेत. या कामात अडथळा आणणाऱ्यांवर शासकीय कामात अडथळा आणल्याबद्दल गुन्हा दाखल करावा, असे निर्देशही आयुक्त राव यांनी दिले.

### विसर्जन व्यवस्थेचा आढावा

या बैठकीत, गणेशोत्सव आयोजन आणि विसर्जन व्यवस्था यांचाही आयुक्त राव यांनी आढावा घेतला. यावर्षी, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, सहा फुटांपर्यंतच्या सर्व मूर्ती कृत्रिम तलावातच विसर्जित केल्या जाणार आहेत. त्यामुळे कृत्रिम तलावांची संख्या वाढवण्यात आली आहे. तसेच, फिरती विसर्जन पथके अधिक करून मोठमोठ्या गृहसंकुलात विसर्जनाची फिरती पथके जातील याची व्यवस्था केली असल्याने त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त राव यांनी केले.

### धोकादायक इमारती रिक्त करा

पावसाळ्यातील आताचा काळ धोकादायक इमारतींसाठी कसोटीचा असतो. त्यामुळे अजूनही ज्या अतिधोकादायक इमारतींमध्ये नागरिक राहत आहेत त्या इमारती तातडीने रिक्त करून त्या सील कराव्यात. त्याचा ताबा पुन्हा रहिवाशांनाच दिला जाईल, असा विश्वास त्या नागरिकांना द्यावा, असे आयुक्त राव यांनी पुन्हा स्पष्ट केले.

# डोंबिवलीतील सागावमध्ये ज्वेलर्सचे दुकान फोडले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली जवळील सागाव परिसरात असलेल्या चंदन ज्वेलर्सच्या कंपनीच्या बाजूने असलेल्या भिंतीला भगदाड पाडून चोरट्यांनी लाखोचे दागिने लांबविल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस सीसीटीव्हीच्या मदतीने चोरट्याचा शोध घेत असल्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी सांगितलं. शहरात चैनसाखळी चोरीं, मोबाईल चोरीच्या गुन्ह्यात वाढ झाली असून चोरट्यावर लक्ष ठेवण्यासाठी त्यांना गुन्हा करण्यापासून रोखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे जाळे सर्वत्र विणले गेले असले तरी चोरट्यांना सीसीटीव्हीचे देखील भय उरलेले नसल्याचे दिसत आहे. डोंबिवली जवळील सागाव परिसरात असलेल्या चंदन ज्वेलर्स या सोन्याच्या दुकानात सोन्याचे दागिने आर्कषक पद्धतीने मांडून ठेवल्याची रेकी करत चोरट्यांनी शुक्रवारी रात्री या दुकानाच्या मागील बाजूस असलेल्या बंद पडलेल्या कंपनीच्या बाजूने भिंतीला भगदाड पाडले. मजबूत बांधकाम असलेल्या या भिंतीत असलेल्या खिडकीचे लोखंडी बार गॅस कटरच्या मदतीने कापून काढत मजबूत भिंत तोडून चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला.

# उरण-बेलापूर, नेरूळ लोकलच्या फेऱ्या वाढणार?





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** उरणचे आमदार महेश बालदी यांनी गुरुवारी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. उरण ते बेलापूर/नेरुळ मार्गावरील लोकलच्या फेऱ्यात वाढ करण्याची तसेच लोकलच्या प्रवाशांच्या इतर समस्या सोडविण्याची मागणी बालदी यांनी केली. या बैठकीत वैष्णव यांनी सकारात्मक भूमिका घेत येत्या काळात या मार्गावर दहा फेऱ्या वाढविण्याचे आश्वासन दिले.

या भेटीदरम्यान उरण ते बेलापूर/नेरूळ या महत्त्वपूर्ण रेल्वे मार्गासंदर्भात केंद्रातील संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रवाशांच्या सोयीसाठी लवकरच सध्याच्या ४० फेऱ्यांऐवजी ५० फेऱ्या सुरू करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यामुळे उरण व नेरूळ परिसरातील प्रवाशांचा दैनंदिन प्रवास अधिक सुखकर, सोयीस्कर आणि वेळेवर होण्यास मदत होणार आहे. या बैठकीत रेल्वेमार्ग, फेऱ्या वाढविण्याबाबतच तसेच या मार्गावरील प्रवाशांना भेडसावणाऱ्या इतर प्रश्नांवरही सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. स्थानकांतील सुविधा, वेळापत्रकातील नियमितता, तांत्रिक अडचणी आणि स्थानिक गरजांबाबत मांडणी करून त्यांचे निराकरण करण्यासाठी लवकरच ठोस पावले उचलली जाणार आहेत.

# प्रभाग फुटल्याने ठाकरे सेना कोर्टात

## प्रभाग रचनेविरोधात उबाठा गट आक्रमक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई, ता. २४** नवी मुंबई महापालिका आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने पालिकेच्या संबंधित विभागाने प्रभागरचनांचा प्रारूप आराखडा जाहीर केला. या आराखड्यानुसार अनेक जणांचे प्रभाग फुटले असून, दुसऱ्या प्रभागांना जोडण्यात आल्याच्या तक्रारी राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून केल्या जात आहेत. हा आराखडा सत्ताधारी धार्जीण असून, त्याविरोधात न्यायालयात दाद मागण्याची तयारी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने केली आहे. कोविडमुळे रखडलेली महापालिकेची निवडणूक आता तब्बल पाच वर्षांनी होत आहे. डिसेंबरनंतर निवडणुकीचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे. त्यानुसार निवडणूक विभागाने १११ प्रभागांचे तयार केलेले पॅनेलनिहाय प्रभागरचना जाहीर केल्या. या प्रभागरचनेवर ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांना हरकती आणि सूचना सादर करायच्या आहेत, मात्र जाहीर केलेल्या रचनेत अनेक प्रभागांच्या सीमा चुकीच्या पद्धतीने जोडल्या गेल्याचा आरोप स्थानिक माजी नगरसेवक आणि इच्छुक उमेदवारांनी केले आहेत. सीवूड्स येथील ठाकरे गटाच्या शिवसेनेचे उपशहरप्रमुख समीर बागवान यांनी ही प्रभागरचना सत्ताधाऱ्यांच्या सोयीनुसार तयार केल्याचा आरोप केला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि नगरविकास विभागाने जून २०२५ मध्ये जारी केलेल्या शासन आदेशानुसार प्रभाग निश्चित करताना भौगोलिक एकसंधता व नैसर्गिक सीमा पाळणे बंधनकारक आहे. तरीसुद्धा सीवुड्समधील एकसंध परिसर मैदान, झाडी व पाण्यातून कृत्रिम रेषा ओढून तोडण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रभाग निश्चित करताना लोकसंख्या व सामाजिक घटकांचा न्याय्य विचार करणे आवश्यक आहे. आरोग्य केंद्र, बाजारपेठ, स्मशानभूमी, शाळा यासारख्या सामाजिक सुविधा असलेल्या प्रभागातच परिसराचा समावेश करणे आवश्यक असताना, सेक्टर-४० आणि ४२ हा परिसर सिवूड्सपासून तोडण्यात आला.

# अंबरनाथ मनसेला मिळणार नवा अध्यक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** शहरातील मनसेच्या नव्या शहराध्यक्षपदासाठी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यासोबत रविवारी किंवा सोमवारी बैठक होणार असून, या बैठकीत अंबरनाथ मनसे शहराध्यक्ष पदाची घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

काही दिवसांपूर्वी अंबरनाथ शहरातील मनसे शहराध्यक्ष कुणाल भोईर यांच्यासह तीन माजी नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता.

या घडामोडीनंतर आक्रमक झालेल्या मनसे पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत गेलेल्या माजी नगरसेवकांच्या कार्यालयाबाहेर नोटांचे बंडल दाखवून घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला होता.

या मोठ्या राजकीय घडामोडीनंतर प्रथमच शुक्रवारी मनसेचे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव अंबरनाथमध्ये दाखल झाले. शिवाजीनगर येथील मनसेच्या कार्यालयात त्यांनी स्थानिक मनसैनिकांशी संवाद साधला

यावेळी पक्ष सोडून गेलेल्या माजी नगरसेवकांवर जाधव यांनी त्यांच्या खास शैलीत जोरदार टीका केली. तसेच, अंबरनाथ शहरात रविवारी किंवा सोमवारी नव्या शहराध्यक्षाची नेमणूक केली जाईल, असे आश्वासन कार्यकर्त्यांना दिले.

## खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते

# गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या मोफत बसगाड्यांचा शुभारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शिवसेनेकडून यंदाही गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुकर करण्यात आला आहे. शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने यंदाही कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात गणेशोत्सवासाठी तब्बल ७१३ मोफत बसेस सोडण्यात येणार आहेत. यापैकी कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ येथून आज रवाना होणाऱ्या ४६५ बसगाड्यांना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी भगवा झेंडा दाखवत मार्गस्थ केले. सर्व गणेशभक्तांनी यावेळी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचे आभार मानले.





गणेशोत्सव म्हणजे सर्व कोकण वासियांसाठी एक आनंदसोहळाच. या आनंद सोहळ्यात सहभागी होण्यासाठी मोठया संख्येने चाकरमानी कोकणात जात असतात. याच पार्श्वभूमीवरी दरवर्षी खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून रत्नागिरी, चिपळूण, लांजा, देवगड यांसह सांगली, सातारा आणि कोल्हापूर याठिकाणी जाण्यासाठी मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात येते. दरवर्षी कल्याण लोकसभेतून सुमारे ७०० ते ८०० बस कोकणात रवाना होत असतात. राज्यात गणेशोत्सवाच्या तयारीसाठी गणेशभक्तांची लगबग सुरू झाली आहे. दरवर्षी कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात हजारोंच्या संख्येने गणेशभक्त जात असतात.

या गणेशभक्तांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून यंदा ७१३ मोफत बसगाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मागील दोन महिन्यांपासून यासाठी मतदारसंघातील शेकडो नागरिकांनी आपली नाव नोंदणी केली होती. यानुसार या सर्व बसगाड्या आज रविवार २४ ऑगस्ट आणि उद्या सोमवार २५ ऑगस्ट रोजी कोकणात आणि पश्चिम महाराष्ट्रात रवाना होणार आहेत. यासर्व गाडयांना खासदार डॉ.शिंदे हे भगवा झेंडा दाखवून गाड्या रवाना करणार आहेत.

यातील कल्याण, डोंबिवली, मुंब्रा, उल्हासनगर तसेच अंबरनाथ येथील एकूण ४६५ गाड्या कोकणात आणि पश्चिम महाराष्ट्रात आज रवाना झाल्या. यासाठी गणेशभक्तांकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यामध्ये आज, २४ ऑगस्ट रोजी अंबरनाथ शहरातून ११, उल्हासनगर शहरातून ४, कल्याण पूर्वेतील १२०, कल्याण पश्चिमेतून १७ तर डोंबिवली शहर आणि डोंबिवली ग्रामीण येथून ३१० आणि मुंब्रा येथून ३ बसेस सोडण्यात आल्या.

तर उद्या २५ ऑगस्ट रोजी दिवा शहरातून ११७ आणि कळवा येथून १३१ बस सोडण्यात येणार आहेत. अशा पद्धतीने दोन दिवसात कोकणात आणि पश्चिम महाराष्ट्रात ७१३ बस मोफत सोडण्यात येणार आहे.

# अपघात , वाहतूक कोंडीमुळे भिवंडीत अवजड वाहनांना नो एन्ट्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शरद भसाळे**

**भिवंडी ( प्रतिनिधी ) :** भिवंडी शहर हे गुजरात कडून मुंबईकडे व मुंबईकडून परत गुजरातकडे त्याचप्रमाणे गुजरातकडून नाशिककडे व नाशिककडून गुजरातकडे जाणाऱ्या मार्गावरील भिवंडी प्रमुख शहर असल्याने या शहरातून मोठ्या प्रमाणावर जड व अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते हि सदर वाहतूक संक्रमण प्रकारची असल्याने या वाहनांमुळे शहर आणि परिसरात अपघातांसह वाहतूक कोंडी होऊन शहराचे जनजीवन धोक्यात आले आहे. या बाबत शहरातील लोकप्रतिनिधी आणि समाजसेवकांनी केलेल्या मागणीची दखल घेत वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ठाणे शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपआयुक्त पंकज शिरसाठ वाहतूक नियंत्रण अधिसुचना जाहीर केली आहे.तसेच

वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

ठाणे आणि मुंबईचे प्रवेशद्वार असलेल्या भिवंडी शहर हे औद्योगिक शहर असून या शहरात पूर्वीपासून मोठा वस्त्रोदयोग सुरु आहे. या उद्योगाला पूरक असलेले यंत्रमाग, डाईंग,सायझीग असे कारखाने आणि कंपन्या मोठ्या संख्येने आहेत. तसेच शहरामध्ये प्लास्टिक मोती बनवण्याचा उदयोग देखील मोठ्या प्रमाणात आहे. त्याच प्रमाणे मुबई महानगर प्रदेशाचे प्रवेशद्वार असल्याने भिवंडी हे लॉजिस्टीक पार्कचे हब म्हणूनसुद्धा ओळखले जाते.त्यामुळे या शहरात मोठ्या प्रमाणात जड-अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. स्थानिक उद्योगाशी जोडलेली वाहतूक हि अवजड वाहनांची नसते. तरी देखील अनेकवेळा हि वाहतूक भिवंडी शहरातून सुरू होऊन शहरातील मार्गाचा उपयोग करून संपविली जात आहे.

भिवंडी महानगराची लोकसंख्या १३ लाखापेक्षा जास्त असून शहरात एकूण सर्व प्रकारची वाहने मिळून अंदाजे ४,५१,६८३ वाहने आहेत. या व्यतिरिक्त भिवंडी हे औदयोगिक शहर असल्याने येथे बाहेरून येणाऱ्या वाहनांची संख्या देखील मोठी आहे,असे ठाणे शहर वाहतूक विभागाने जाहीर केलेल्या अधिसूचनेत नमूद केले आहे. शहरात सर्व प्रकारच्या माल वाहतुकीच्या वाहनांच्या मार्गावर असणारे शासकीय कार्यालये, बाजारपेठा, बँका, दवाखाने, रुग्णालये, शाळा, महाविद्यालय असून शासकीय कर्मचारी दैनंदिन व्यवहारा करीता येणारे जाणारे नागरिक दवाखान्यात दवाउपचाराकरीता येणारे रूग्ण, तसेच महाविद्यालयात येणारे-जाणाऱ्या विदयार्थ्यांची गर्दी असते. त्यामुळे या मुख्य मार्गावर होणारी वाहतूक कोंडी सामान्य नागरिकांना मनस्ताप देणारी असते. त्यामुळे सर्व घटकातील नागरिकांची असुविधा होते. तसेच या व्यवसायिक वाहनांमुळे छोटे मोठे अपघात, प्राणांतिक अपघात तसेच प्राणहानी सुद्धा झालेली आहे. त्यामुळे भिवंडी शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. भिवंडी शहरात व परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे जनतेच्या सोईसाठी आवश्यक असून शहरातील लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी या कोंडीचा तीव्र निषेध करीत गेल्या तीन दिवसांपासून आंदोलन करीत आहेत. या सर्व घटनेची नोंद घेत ठाणे शहर वाहतूक विभागाचे उपयुक्त पंकज शिरसाठ यांनी अधिसूचना जाहीर करीत शहरातून होणाऱ्या वाहतुकीत बदल केले आहेत.

गुजरात वाडा कडुन भिवंडी शहरात येणाऱ्या व नाशिक मुंबई अंजूरफाटा कडे जाणाऱ्या (सहा चाकी वाहनांवरील) सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना वंजारपट्टी नाका उड्डाणपूलावरून शहरात प्रवेश करण्यास 'कायमस्वरूपी प्रवेश बंद' करण्यात आहे. आहे.ही अवजड वाहने वंजारपट्टी पूलावरून डावीकडे वळण घेवून चाविंद्रा मार्गे वडपे येथुन मुंबई नाशिक महामार्गावरून इच्छीत स्थळी जातील. तर वसई अंजूरफाटाकडे जाणारी वाहने चाविंद्रा येथून नाशिक मुंबई महामार्गावरून मानकोली मार्गे इच्छीत स्थळी जातील.

त्याचप्रमाणे कल्याण तसेच मुंबई कडून वाडा गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या (सहा चाकी वाहनांवरील) सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना रांजनोली नाका येथे 'कायमस्वरूपी प्रवेश बंद' करण्यात आला आहे. हि वाहने रांजनोली नाका कडून मुंबई-नाशिक महामार्गावरून वडपे येथून डावीकडे वळण घेवून चाविंद्रा वंजारपट्टी ब्रिज मार्गे वाडा गुजरातकडे इच्छित स्थळी जातील.

अंजुरफाटा मार्गे वाडा गुजरात अथवा नाशिककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या (सहा चाकी वाहनांवरील) सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना अंजुरफाटा येथुं शहरात 'कायमस्वरूपी प्रवेश बंद' करण्यात आला आहे. हि वाहने अंजुरफाटा वरून माणकोली मार्गे मुंबई नाशिक महामार्गाने इच्छित स्थळी जातील. आणि वाडा गुजरात कडे जाणारी वाहने वडपे चाविंद्रा वंजारपट्टी उड्डाणपूल मार्गे इच्छित स्थळी जातील. तळवली नाका कडून शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या (सहा चाकी वाहनांवरील) सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना भिवंडी शहरात 'कायमस्वरूपी प्रवेश बंद' करण्यात आला आहे, असे अधिसूचनेत नमूद केले असून वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहन चालकां विरोधात कारवाई करण्याचा इशारा पोलीस उपआयुक्त शिरसाट यांनी दिला आहे.फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही,असे पोलीस उपआयुक्त पंकज शिरसाठ यांनी सांगितले आहे.



दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार ■ २५ ऑगस्ट २०२५
४
jeevandeepvartanews2020@gmail.com

# राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत मैत्रेय मोकलला रौप्यपदक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**पेण (प्रतिनिधी)**
18 ऑगस्ट ते 21 ऑगस्ट 2025 दरम्यान टाटानगर, झारखंड येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत उरणचा मैत्रेय राजश्री गणेश मोकल याने 93 किलो वजनी गटामध्ये राष्ट्रीय स्तरावर रौप्यपदक पटकावले आहे. यापूर्वी अहमदनगर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेत त्याने सुवर्णपदक मिळवले होते, आणि त्या कामगिरीच्या जोरावर त्याची निवड नॅशनल स्पर्धेसाठी झाली होती.राष्ट्रीय स्पर्धेत त्याने एकूण 658 किलो वजन उचलून ही कामगिरी साध्य केली.या यशामध्ये शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा मोठा वाटा आहे. त्यांच्या मेहनतीमुळेच मैत्रेयला हे यश संपादन करता आले.या स्पर्धेत शेकडो स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.तसेच या रौप्यपदकाच्या जोरावर त्याची निवड आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली असून ती नोव्हेंबर 2025 मध्ये भूतान येथे होणार आहे.त्याच्या या चमकदार कामगिरी बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच, त्याच्या पुढील वाटचालीसाठी सर्वांकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत.





# जागतिक विक्रमासाठी ७९ मिनिटांची स्टॉप स्केटिंग मॅरेथॉन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** देशभक्ती वर आधारित१५ ऑगस्ट २०२५ रोजी, सनराईज इंटरनॅशनल स्कूलमध्ये एक नेत्रदीपक कार्यक्रम झाला ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी जागतिक विक्रम प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने ७९ मिनिटांच्या नॉन-स्टॉप स्केटिंग मॅरेथॉनमध्ये सहभाग घेऊन उपस्थित पाहुण्यांची मने जिंकली.या. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. श्रीमती नेहा रुचंदानी, विश्वस्त वीरेन तलरेजा, विश्वस्त सुमन तलरेजा आणि सचिव मनीष तलरेजा यांच्यासह इतरही मान्यवर उपस्थित होते. बदलापूर मधील सनराईज इंटरनॅशनल स्कूल हे नेहमीच आपल्या वेगळेपणा साठी प्रसिद्ध आहे, या स्वातंत्र्य दिनी देशभक्तीवर आधारीत शाळेतील स्केटरनी भारतीय तिरंग्यांला स्केटिंग च्या माध्यमातून मानवंदना देण्याचा निर्णय घेतला.यासाठी स्केटरनी ७९ मिनिटे नॉन-स्टॉप स्केटिंग करून त्यांची सहनशक्ती ,देशभक्ती, कौशल्ये दाखवली.यामागील उद्देश होता,यूएन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स, जीनियस इंडियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स, आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका बुक ऑफ वल्ड रेकॉर्ड्स या तीन प्रतिष्ठित पुस्तकांमध्ये विक्रम प्रस्थापित करण्याचा होता. यामध्ये सहभागींना पाहुण्यांच्या हस्ते पदके देऊन सन्मानित करण्यात आले आणि तिन्ही रेकॉर्ड बुककडून प्रमाणपत्रे देण्यात येतील.असे आश्वासन दिले. हा कार्यक्रम प्रचंड यशस्वी झाला, या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यार्थी, पालक आणि शाळा प्रशासनाने अभिनंदन केले.




# मांडवी किनारा पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** ओतूर येथील मांडवी किनारा पतसंस्थेची २६ वी वार्षिक सभा उत्साहातओतुर: मांडवी किनारा नागरी सहकारी पतसंस्था मर्या, ओतुरची २६ वी वार्षिक सभा रविवार दि. २४ ऑगस्ट रोजी राज लॉन्स कार्यालय येथे पतसंस्थेचे अध्यक्ष संभाजी विठ्ठल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली खेळी मेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी विघ्नहर कारखान्याचे संचालक धनंजय डुंबरे,बाळासाहेब घुले, विलास दागंट, संचालिका निलम तांबे, सरपंच छाया तांबे, वकील संघ जुन्नरचे अध्यक्ष अँड.शिवदास तांबे, उपाध्यक्ष अजीज खान, अँड l महावीर चोरडिया, सहाय्यक पोलिस निरिक्षक दिनकर नलावडे, अध्यक्ष लेण्यादी देवस्थान ट्रस्ट संजय ढेकणे, तसेच पतसंस्थेचे उपाध्यक्ष गणपत डुबरे, सचिव अशिष शहा, संचालक बबन तांबे, विठ्ठल तांबे, कैलास, पानसरे, सिताराम ढमाले, विठ्ठल डुंबरे, संजय वेताळ, सतिष गीते, सुशिला तांबे, मंजुषा डुंबरे, जयसिंग काळे, डॉ.भरत घोलप, विश्वास इसकांडे,विशाल बनकर आदी. उपस्थित होते. यावेळी माजी सैनिक, आरोग्य प्राथमिक केंद्रातील डॉक्टर, पत्रकार, उपस्थित मान्यवर यांचा सन्मान करण्यात आला. अहवाल सालात संस्थेकडील सभासद संख्या- ६१६५ असून, संस्थेचे वसुल भाग भांडवल ४ कोटी ३० लाख आहे, स्वनिधी व गंगाजळी ७ कोटी ३३ लाख असून संस्थेच्या ठेवी ७४ कोटी, कर्ज वाटप ३३ कोटी, संस्थेची गुतवणुक २३ कोटी आहे संस्थेचे थकबाकीचे शेकडा प्रमाण ५.५५% आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेवेळी अध्यक्ष संभाजी तांबे यांनी सांगितले की सभासदांना ११% लाभांश देण्यात येणार आहे. प्रास्तविक व सूत्रसंचालन अँड जयराम तांबे यांनी केले डॉ.भरत घोलप यांनी सर्व सभासदांचे आभार मानले.

# नूतन ज्ञानमंदिरात रानभाजी प्रदर्शन, पाककला स्पर्धा संपन्न

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** रोटरी क्लब ऑफ डोंबिवली फिनिक्स व पर्यावरण दक्षता मंडळ डोंबिवली व नूतन ज्ञान मंदिर कल्याण पूर्व यांच्या संयुक्त विद्यमाने रान पावसाळी रानभाजी प्रदर्शन व पाककला स्पर्धा पालकांसाठी याचे आयोजन शुक्रवारी नूतन ज्ञान मंदिर कल्याण पूर्व येथे करण्यात आले होते या प्रदर्शनाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक आर.टी. पाटील यांनी केले. यावेळी पर्यावरण दक्षता मंडळाच्या रुपाली शाईवाले यांनी प्रदर्शनाची मांडणी केली. या प्रदर्शनाला विद्यार्थी व पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. पालकांनी पावसाळी रानभाज्या प्रदर्शनात रानभाज्यांच्या पाककला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यात पालकांनी वेगवेगळ्या प्रकारच्या रानभाज्यांपासून तरुणांना भुरळ पाडणाऱ्या फास्ट फूड सोबत जणू स्पर्धा स्पर्धा केली असे वाटत होते.

यामध्ये पालकांनी विविध रानभाज्यांपासून बनवलेले पदार्थ बनविले होते. यामध्ये कर्टुलेचे मोमोज, कर्टुलेचे मोदक, चूक्याची चटणी, करडूची आवडी, त्याचप्रमाणे केळ फुलाचे व वाफळीचे थालीपीठ, कवळयाच्या भाजीच्या वड्या, परवलाची बर्फी भारंगची भाजी टाकळयाचे पराठे शेवग्याच्या पानांचे चीज बॉल असे वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ बनवून पालकांनी या स्पर्धेला उस्फुर्त असा प्रतिसाद दिला. शाळेतील सर्व शिक्षक कार्यक्रमांस उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास लोखंडे व सुलभा परदेशी यांनी केले. श्रद्धा सावंत भोसले यांनी शाळेतर्फे आभार मानले. संस्कृतीक प्रमुख रेणुका जोईल व ज्योती चौधरी यांनी कार्यक्रमाची नियोजनबद्ध आखणी केली. यात विद्यार्थी शिक्षक पालक शिक्षकेतर कर्मचारी या सगळयांचा उत्स्फूर्त सहभाग होता.



# बाप्पाच्या आगमनासाठी बाजारपेठा सजल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दोन दिवसावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी खरेदी करण्यासाठी वाशिंद बाजारपेठ गणेश भक्तांनी फुलून गेली आहे. अवघ्या दोन दिवसावर गणपत्ती बाप्पाचे आगमन आलेअसले तरी धो-धो पडणा-या पावसामुळे बाजार पेठेत शुकशूकाठ होता. मात्र आता पावसाची उघडझाप सुरू असल्याने वाशिंद बाजारपेठा गणेश भक्तांनी फुलून गेल्याचे द्दृश्य दिसून येत आहे. गणेशोत्सवासाठी मखर सजावठींची दुकाने ग्राहकांचे लक्ष ओढून घेत आहेत. विविध शोभेच्या वस्तूंची बाजारपेठेत रेलचेल आहे. रंगी बेरंगी लाईटची दुकाने सजली आहेत. पुजे साठी लागणा-या साहित्य खरेदी करण्यासाठी दुकाना बाहेर गर्दी वाढू लागली आहे.

# कल्याण पूर्वेतील चिंचपाड्यात अस्वच्छता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. २४ (बातमीदार):** गणेशोत्सवाच्या दोन दिवस आधी चिंचपाडा येथील लक्ष्मी नगर परिसरात प्रचंड अस्वच्छता पसरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. रस्त्याच्या कडेला साचलेला कचऱ्याचा ढीग, पावसामुळे कुजलेला कचरा आणि त्यामुळे निर्माण झालेली दुर्गंधी यामुळे स्थानिक रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सततच्या पावसामुळे परिसरात चिखल, साचलेले पाणी आणि कुजणाऱ्या कचऱ्यामुळे डास आणि इतर कीटकांची वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, लहान मुलांना आणि वृद्धांना या दुर्गंधीमुळे त्रास होतो आहे. स्थानिक प्रशासनाने वेळेवर लक्ष घालून स्वच्छता मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# कल्याण रेल्वे स्थानकात रिक्षाचालकांची दादागिरी
## प्रवाशांचे भाडे नाकारण्यावरून पत्रकारासोबत अरेरावी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाबाहेर रात्रीच्या वेळेत एका रिक्षा चालकाने भिवंडीतील एका प्रवाशाच्या अंगावर रिक्षा घालून त्याला जखमी करण्याचा प्रयत्न केला होता. ही घटना ताजी असतानाच शुक्रवारी रात्री खडकपाडा, बेतुरकरपाडा भागात रिक्षेचे भाडे नाकारणाऱ्या रिक्षा चालकांची माहिती घेण्यासाठी कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागात गेलेल्या एका पत्रकाराला तीन रिक्षा चालकांनी घेरून त्यांच्या सोबत अरेरावी केली.



पत्रकारा सोबत अरेरावी सुरू असताना काही प्रवाशांनी कल्याण पश्चिमेतील रेल्वे स्थानका बाहेरील रिक्षा चालक नेहमीच प्रवाशांना भाडे घेण्यावरून वाद घालत असतात. प्रवाशांशी उध्दटपणे बोलतात. रिक्षा चालक रिक्षा रिकाम्या उभ्या असताना भाडे घेण्यास नकार देतात, अशा तक्रारी केल्या. कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागात संध्याकाळच्या वेळेत बेतुरकरपाडा, खडकपाडा येथे जाण्यासाठी रिक्षा वाहनतळावर रिक्षा रिकाम्या उभ्या असतात, पण ते प्रवासी भाडे घेत नाहीत. रिक्षा वाहनतळावर दररोज दीडशेहून अधिक प्रवासी रिक्षेची वाट पाहत उभे असतात. हे रिक्षा चालक भाडे घेण्यास तयार होत नाहीत. रिक्षा चालकांचा हा दररोजचा प्रकार आहे. याविषयी वाहतूक विभागाकडे तक्रारी करूनही उपयोग होत नाही. त्यामुळे काही प्रवाशांनी पत्रकार विजय ठाकरे यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची शहानिशा करण्यासाठी पत्रकार ठाकरे आणि सहकारी कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळ शुक्रवारी रात्री गेले होते.

यावेळी रेल्वे स्थानकाबाहेर शंभरहून अधिक प्रवासी रांगेत उभे असल्याचे आणि बाजुला रिक्षा वाहनतळावर काही रिक्षा चालक रिक्षा रिकाम्या असताना प्रवाशांना रिक्षेतून सोडण्यास तयार नव्हते असे चित्र पत्रकार ठाकरे यांना दिसले. हा सगळा प्रकार त्यांनी आपल्या जवळील कॅमेऱ्यातून दृश्यध्वनी चित्रणातून टिपण्याचा प्रयत्न केला. यावेळी तीन रिक्षा चालक अचानक पत्रकार ठाकरे यांच्या अंगावर धाऊन आले. त्यांनी ठाकरे यांना तुम्ही आमच्या रिक्षेचे चित्रण का केले. तुम्हाला आमच्या रिक्षेचे दृश्यचित्रण करून काय मिळणार आहे, असे प्रश्न करू लागले. यावेळी प्रवाशांच्या तक्रारीवरून आपण याठिकाणी वार्तांकन करण्यासाठी आलो आहोत, हे सांगुनही रिक्षा चालक अरेरावीची भाषा कमी करत नव्हते.

# दुचाकी घसरून ट्रकखाली आल्याने डॉक्टरचा जागीच मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** दुचाकीवरून घरी जात असतानाच दुचाकी रस्त्यावर घसरून ट्रकखाली गेलेल्या डॉक्टरचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताचा थरार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. यासह भिवंडी शहरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या वाहन अपघातात तिघांचा मृत्यू झाला. याप्रकरणी दोन पोलीस ठाण्यात तीन चालकांच्या विरोधात गुन्ह्याची नोंद झाली आहे. विश्वनाथ एकनाथ ठोके (रा.डोंबिवली पूर्व), डॉ. मो.नसीम अमीनुद्दीन अन्सारी (58, रा. गुलजार नगर, भिवंडी) आणि एक अज्ञात इसम अशी मृतकांची नावे आहेत.

वाहन चालकांविरोधात गुन्हा दाखल : विश्वनाथ ठोके हे गुरूवारी रात्री साडे दहाच्या सुमारास डोंबिवलीहून दुचाकीवरून मानकोली इथं जात असताना त्यांना चारचाकी वाहन क्र. एम एच 05 सीए 0022 नं जोराची धडक दिली. या भीषण अपघातात विश्वनाथ ठोके यांचा जागीच मृत्यू झाला. तर 19 मे 2013 ला अज्ञात वाहन चालकानं अज्ञात व्यक्तीला मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी बायपास हद्दीतील एका हॉटेलसमोर जोराची धडक दिली होती. या अपघातात अज्ञात व्यक्तीचा रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता. याप्रकरणाच्या चौकशीनंतर अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला शुक्रवारी अज्ञात वाहन चालकाच्या विरोधात तसंच विश्वानाथ ठोके यांच्या मृत्यू प्रकरणी चारचाकी वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

अपघाताचा थरार सीसीटीव्हीमध्ये कैद : डॉ. नसीम अन्सारी त्यांच्या दुचाकीवरून शुक्रवारी रात्रीच्या सुमारास भिवंडी शहरातील एसटी स्टँडकडं जात असताना सिराज हॉस्पिटलजवळ त्यांची दुचाकी रस्त्यावर घरसली. यावेळी ते ट्रकच्या चाकाखाली सापडले. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताचा थरार सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाला आहे. स्थानिकांनी या घटनेबाबत मनपा प्रशासनाला जबाबदार धरलं. मनपाने स्व. एपीजे अब्दुल कलाम उड्डाण पूल शुक्रवारी रात्रीच्या वेळी दुरूस्ती साठी बंद केला होता. त्यामुळं अवजड शहरातील अंतर्गत रस्त्यावरून प्रवास करत होते. त्यामुळं हा अपघात झाल्याचा आरोप स्थानिकांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला. या अपघाताची नोंद निजामपूरा पोलीस ठाण्यात झाली असून ट्रक चालकाविरोधात गुन्ह्याची नोंद झाली आहे.

# डिजिटल युगात नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक
## - पोलीस उपायुक्त अतुल झेंडे




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सध्याच्या डिजिटल युगात फसवणूक करणारे तंत्रज्ञान वाढत असून यामुळे अनेकांना मोठ्या आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे. यातून वाचण्यासाठी नागरिकांनी देखील सतर्क राहणे आवश्यक आहे. मोबाईलवर येणाऱ्या अनोळखी व्यक्तीकडून पाठवण्यात आलेले मॅसेज अथवा कॉलद्वारे दाखविण्यात येणाऱ्या प्रलोभनाला बळी पडू नये असे आवाहन कल्याण परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी येथे व्यक्त केले.

प्रेस क्लब, कल्याण यांच्यावतीने अतुल झेंडे यांचा वार्तालाप शनिवारी आचार्य अत्रे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी, व्यासपीठावर पोलीस निरीक्षक बाळासाहेब उघडे, प्रेस क्लब, कल्याणचे अध्यक्ष आनंद मोरे, कार्याध्यक्ष कुणाल म्हात्रे, सचिव विष्णुकुमार चौधरी, ज्येष्ठ पत्रकार रमेश दुधाळकर आणि विनायक बेटावदकर उपस्थित होते. दरम्यान, प्रेस क्लब, कल्याण रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करत असून, या वर्षात विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार असल्याचे अध्यक्ष आनंद मोरे यांनी सांगितले. यावेळी क्लबच्या नवीन लोगोचे अनावरण अतुल झेंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

अमलीपदार्थ बाळगणाऱ्यावर मागील काही महिन्यांपासून कारवाई करण्यात येत असून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ड्रग्स तसेच अन्य अमलीपदार्थांबाबत शाळांमध्ये पोलीस दादा आणि पोलीस दिदिंमार्फात वेळोवेळी मार्गदर्शन शिबीर राबविण्यात येते. कल्याण डोंबिवली शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांच्या मदतीला पोलीस मित्र देखील असतात. त्यांच्यामार्फत गुन्हेगारी रोखणे तसेच शहरात सुव्यवस्था राखणे सुलभ होत असल्याचे झेंडे यांनी यावेळी सांगितले.

'डायल ११२' वर संपर्क करणाऱ्यांच्या मदतीसाठी कल्याण परिमंडळ तीनमधील पोलिसांकडे वाहने असल्याने तक्रार प्राप्त होताच पोलिसांना त्याठिकाणी धाव घेणे शक्य होते. कल्याण परिमंडळ तीनच्या पोलिसांचा रिस्पॉन्स टाईम सात मिनिटांचा आहे.

शहरात स्मार्ट सिटीअंतर्गत लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीमुळे शहरात घडणाऱ्या गुन्हेगारीवर आळा बसण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर, शहरातील दुकानदारांनी एक कॅमेरा दुकानाबाहेरील रस्त्याच्या दिशेने लावल्यास एखादी घटना घडल्यास त्या सीसीटीव्हीचा नक्कीच फायदा होऊ शकतो. त्यामुळे, दुकानदारांनी रस्त्याच्या दिशेने एक कॅमेरा लावण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कल्याण डोंबिवली शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता कल्याण पूर्वेत एक आणि काटई नाका येथे एक नवीन पोलीस ठाणे उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याचेही झेंडे यांनी यावेळी सांगितले.

# कोकणातील युवकांनी स्फूर्ती घेऊन उच्च पदावर पोहोचावे - नारायण राणे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सार्वजनिक जीवनात व राजकारणात काम करताना मला मिळालेल्या पदांना मी न्याय देण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असताना राज्यात व देशात मला जो नावलौकिक मिळाला, त्यामागे शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांचा हा निर्णय होता, हे मला सांगताना आजही अभिमान वाटतो.मला दिलेल्या संधीचा उपयोग मी नेहमीच जनतेच्या कल्याणाकरिता सामाजिक, शैक्षणिक व विधायक कामांसाठी केला. या काळात कोकणचा खूप विकास झाला, आताही होत आहे, पुढेही होईल असे उदगार खासदार नारायण राणे साहेब यांनी मुंबईत काढले. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने आयोजित वृत्तपत्र लेखक दिनाच्या कार्यक्रमात ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. ७७ व्या दिनानिमित्त रवींद्र मालुसरे यांनी संपादित केलेल्या "प्रेरक शिल्पकार" या ग्रंथाचे आणि वृत्तपत्र लेखकांनी सोशल मीडियावर मुक्तपणे आणि निर्भीडपणे व्यक्त व्हावे यासाठी बनविलेल्या "जागल्यांचा लोकजागर" या ब्लॉगरचे प्रकाशन नारायण राणे यांच्या हस्ते करण्यात आले.

राणे आपल्या भाषणात पुढे असेही म्हणाले की,जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि उच्च पदावर पोहोचण्यासाठी अल्पसंतुष्ट न राहता सतत संघर्ष केला पाहिजे. मळलेल्या वाटेने जाण्यापेक्षा यशस्वी झालेल्यांपासून स्फूर्ती घेऊन कोकणातील युवकाने पुढे जायला हवे. आयएएस आणि आयपीएस चे प्रमाण अत्यल्प आहे ते भविष्यात वाढायला हवे. त्यासाठी लागणारी संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी मी तयार आहे. मुलांनी उच्च शिक्षित व्हावे यासाठी मी सिंधुदुर्गात मेडिकल, इंजिनिअर कॉलेज काढले आहे. त्याची गुणवत्ता आता दिसत आहे. यापुढे आर्किटेक्ट असो किंवा अन्य कुणीही त्यांनी आयुष्यातील अपयशाच्या तक्रारीचा सूर न लावता आपली चाकोरी सोडून बाहेर पडायला पाहिजे तरच अधिक पैसे आणि नावलौकिक मिळेल.

देशाच्या तिजोरीत मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असलेले शहर ३४ टक्के हिस्सा उचलते. याचा विचार मुंबई लगत असणाऱ्या कोकणी



माणसांनी केला पाहिजे. कोकण हे समृद्ध बनले पाहिजे. मला राज्यात व केंद्रात जी-जी पदे मिळाली, त्याचा उपयोग मी महाराष्ट्राच्या व सिंधुदुर्ग जिल्ह्यात विकासासाठी केला, हे सांगताना मला अभिमान वाटतो. कोकणाच्या विकासाची अशी चर्चा होते, त्यामध्ये माझ्या नावाचाही उल्लेख होतो. त्याचे सर्व श्रेय मी कोकणी माणसालाच देतो. असे राणे आपल्या भाषणात पुढे म्हणाले

# मतचोरीविरोधात ठाण्यात काँग्रेसचा मोर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २४ :** निवडणुकीत कथित मतचोरी आणि त्यामागे भाजप आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी ठाणे शहर काँग्रेसने शनिवारी मशाल मोर्चा काढला. मोर्चाची सुरुवात ठाणे काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयातून होऊन मार्केट रोडमार्गे ठाणे स्टेशनजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळ समारोप करण्यात आला. या वेळी मोर्चात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी घोषण देत परिसर दणाणून सोडला. या मोर्चाचे नेतृत्व काँग्रेस शहराध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण यांनी केले. चव्हाण म्हणाले, की भाजपने निवडणूक आयोगाच्या यंत्रणेचा गैरवापर करून लोकशाहीवर हल्ला केला आहे. ही मतचोरी म्हणजेच लोकशाहीची गळचेपी असून, काँग्रेस संविधान व मतदारांचा सन्मान राखण्यासाठी सतत लढा देत राहील. या आंदोलनात प्रवक्ते राहुल पिंगळे, जे. बी. यादव, आणि नागरिकांनी सहभाग घेतला.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024